# -:: Uजिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त दिनांक १७.०९.२०११ ::-

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा दिनांक १७.०९.२०११ रोजी ३.०० वाजता मा. श्री. के. एस. सोनाळे, अपर जिल्हाधिकारी, गोंदिया. यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात घेण्यात आली. सभेच्या सुरवातीला श्री. सी. वाय पराते, प्रभारी महाव्यवस्थापक, तथा सचिव जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया. यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेला खालील निमंत्रित पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते,

१. श्री. के. एस. सोनाळे, अपर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जि. उ. मि. समिती, गोंदिया.
२. श्री. अशोककूमार पी. अग्रवाल, राईस मिलर्स असोसिएशन, गोंदिया.
३. श्री. गजाननजी अगवाल, अध्यक्ष लाख इंडस्ट्रिज असोसिएशन, गोंदिया.
४. श्री. हूकूमचंद अग्रवाल, अध्यक्ष, एम आय डी सी इंडस्ट्रिज असोसिएशन, गोंदिया.
५. श्री. मोहन घाटोळ, सहाय्यक संचालक, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, गोंदिया.
६. श्री. एस. सी. शाह, विभागीय व्यवस्थापक, एम. एस. एस. आय. डी सी. नागपूर.
७. श्री. डी. एम. पुसलेकर, व्यवस्थापक, एम. एस. एस. आय. डी सी. नागपूर.
८. श्री. आर. जी. राऊत, जिल्हा सहनिबंधक, भंडारा.
९. श्री. एस. पी. उजवणे, विक्रीकर निरीक्षक, गोंदिया.
१०. श्री. सी. बी. वालदे, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया, गोंदिया.
११. श्री. सी. वाय. पराते, प्रभारी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया.
१२. श्री. एम. जी. चंद्रिकापूरे, जिल्हा कृषि अधिकारी, गोंदिया.
१३. श्री. पी. डी. मेंढी, तांत्रिक सहाय्यक, म. औ. वि. म, उपविभाग, गोंदिया.
१४. श्री. एस. बी. ताजने, पोलीस निरीक्षक, गोंदिया.
१५. श्री. उ. म. भादूले, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा.
१६. श्री. शिवकूमार गोरेलाल अग्रवाल, अध्यक्ष, विदर्भ आटाचक्की असोसिएशन, गोंदिया.
१७. श्री . रामअवतार नानकराम अग्रवाल, सचिव, म. रा. लघु कुटीर उद्योग संघ, गोंदिया.
१८. श्री. विजयकुमार अग्रवाल, गोंदिया.
१९. श्री. प्रकाश आर. जायस्वाल, गोंदिया.

## १) <u>मागिल सभेचे कार्यवृत्तास मंजुरी देणे :-</u>

सर्वप्रथम दिनांक १३.०६.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे कार्यवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आले होते त्यावर श्री विजय अग्रवाल यांनी कार्यवृत्त चुकीचे तयार केले असा आक्षेप घेतला सदर बाबीची नोंद घेण्यात येऊन ईतर आक्षेप नसल्यामुळे कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली व सभेची पुढील कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली.

## २) <u>मागील प्रलंबीत विषयावर चर्चा :-</u>

१. **उष्णा / पॅरॉबॉईल्ड राईस मिलमधून निघणा-या राखेची विल्हेवाट लावणेबाबत :-** राखेची विल्हेवाट लावण्याकरीता अजुनही उपयुक्त जागा मिळाली नसल्यामुळे याविषयात अजुनही काही प्रगती झालेली नाही तेव्हा लवकरात लवकर उपयुक्त जागा शोधुन पुढील सभेत कळवावे असे अध्यक्षांनी सांगीतले होते तेव्हा याबाबत खनिकर्म अधिकारी, गोदिया यांचे कडून जागेची माहीती घ्यावी तसेच श्री चंद्रिकापूरे, जिल्हा कृषि अधिकारी, यांनी शेतीकरीता राखेचा वापर व महत्व याबाबत शेतकऱ्यांमध्ये प्रचार व प्रसार करावा असे निर्देश दिलेत. तसेच राईस मिलर्सची राखेच्या विल्हेवाटीकरीता जागेची खरेदी करण्याची तयारी असल्याचे श्री हूकूमचंद अग्रवाल यांनी सभेत सांगीतले.

२. **एमआयडीसी क्षेत्रात ग्राम पंचायत व एमआयडीसी टॅक्सबाबत:-** सदर विषय मंत्रालय स्तरावर अंतीम निर्णयासाठी विचाराधीन असल्यामुळे सदर विषयावर चर्चा करणे आवश्यक नाही.

३. **विद्युत वितरण कं व्दारा सुरक्षा ठेव रक्कम व त्यावरील व्याज देण्यास टाळाटाळ करणेबाबत.:-** सदर सभेत महावितरणचे कूणीही अधिकारी उपस्थित नव्हते त्यामुळे सदर मुद्यांशी संबधित श्री विजय अग्रवाल व सभेतील सर्व सदस्य पदाधिकारी व अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली व महावितरणचे मुख्य अभियंता यांना याबाबत पत्राने सभेच्या भावना कळविण्याचे सदस्य सचिव हयांना निर्देश दिलेत.

४. **महावितरण (MSEB):-** महावितरणव्दारे, लोड शेडींग असल्यावरही उद्योग घटकांकडून पुर्ण फिक्स चार्जेस घेतल्या जातात तेव्हा फिक्स चार्ज हा लोड प्रमाणे घेतल्या जातो परंतु घटक बंद किंवा दुरूस्ती मध्ये असला तेव्हा फिक्स चार्ज आकारल्या जाऊ नये असे संघटनांनी सांगीतले तेव्हा सदर विषय एम ई आर सी शी संबंधित आहे असे महावितरणचे अधिकाऱ्यांनी मागील सभेत सांगीतले. त्यावर महाव्यवस्थापक यांनी एम ई आर सी ला पत्र लिहावे व त्यावर काय निर्णय होतो ते संघटनांना कळवावे तसेच या एकसारख्या तक्रारी निकाली काढण्याकरीता महावितरणने उर्जा मित्र सारखी विशेष सभा नियमित घेऊन उद्योजकांचे प्रश्न निकाली काढावेत. व सदरबाबत मुख्य अभियंता, महावितरण यांना पत्र पाठविण्याचे निर्देश सदस्य सचिव हयांना अध्यक्षांनी दिले. तेव्हा याबाबत पत्र पाठविण्यात आले असल्याची माहीती महाव्यवस्थापक यांनी सभेत दिली.

५. **जमिन अकृषक करण्याकरीता लागणारी फी ५ पट वाढविल्याबाबत.** सदर विषयावर श्री गजाननजी अग्रवाल यांनी सभेत सांगीतले की, शासनाने जमिन अकृषक करण्याकरीता लागणारी फी ५ पट वाढविली आहे. परंतू स्थानिक पटवारी यांना विचारले की याबाबत शासनाचे कुठलेही आदेश पत्रक वगैरे नसल्याचे सांगतात. परंतू ही फी

वाढ अन्यायकारक आहे यामुळे उद्योगांशी निगडीत सर्व बाबींवर प्रभाव पडून महागाई वाढण्यास चालना मिळेल. त्यावर अध्यक्ष महोदयांनी सदर मुद्दाशी संबधित शासन निर्णय उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते. ते शासन निर्णय संघटनांना उपलब्ध करून दिल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले तेव्हा औद्योगीक संघटनांनी ही वाढ कमी करण्याबाबत शासनास कळविण्याची विनंती केली यावर आपण आपले निवेदन द्यावे ते शासनाला सदस्य सचिवांमार्फत पाठविण्यात येईल असे अध्यक्ष महोदयांनी सांगीतले होते.

६. **एम. आय. डी. परीसरात दुरध्वनी सेवा खराब असल्याबाबत.:-** एमआयडीसी परिसरात दूरध्वनी सेवा खराब असल्याबाबत असोसिएशनचे अध्यक्ष श्री हूकूमचंद अग्रवाल यांनी सांगीतले तसेच तक्रार करूनही १०/१५ दिवस कुणीही प्रतिसाद देत नाही असे सांगीतले त्यावर अध्यक्षांनी सदर बाबीवर दूरसंचार विभागाला भेट देऊन प्रश्न निकाली काढण्याचे निर्देश महाव्यवस्थापक यांना दिले, मागील सभेत बी एस एन एल चे ए जी एम श्री संगमा उपस्थित होते त्यांनी सर्वांच्या समस्या एकून घेतल्या व स्वतःचा दूरध्वनी क्रमांक दिला तसेच काही तक्रारी असल्यास मला कळवा त्या लगेच दूर होतील असे आश्वासन त्यांनी दिले होते.

७. **महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे कार्यप्रणालीबाबत:-** म प्र नि मंडळाव्दारे संमति पत्र (consent letter) मिळण्याकरीताचे शुल्क १० पट आकरणे न्यायसंगत नसल्याबाबत जिल्हयातील राईस मिलर्स असोसिएशन या औद्योगीक संघटनेने निवेदन दिल्याबाबत महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले होते. मागील सभेत दिलेल्या निर्देशांप्रमाणे म प्र नि मंडळाचे संचालक यांना अध्यक्षांचे सहीने पत्र पाठविण्यात आलेले आहे. व त्याच्या प्रती सर्व औद्योगीक संघटनांना दिलेल्या आहेत. असे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले होते.

**मागील सभेस** म.प्र.नि. मंडळाचे क्षेत्र अधिकारी श्री जितेन्द्र एच पुरते हजर होते. त्यांनी सभेत सांगीतले की, दहा पट दंड आकारू नये याबाबत त्यांचे अधिकाऱ्यांनी त्यांना मौखिक निर्देश दिलेले आहेत व त्यांची अंमलबजावणी सुदधा होत आहे तेव्हा अध्यक्ष महोदयांनी म.प्र.नि. मंडळाचे हे निर्देश सर्व औद्योगीक संघटनांना त्यांनी कळवावे असे सांगीतले. व म प्र नि मंडळाचे अधिकारी श्री फुलमाळी यांना अध्यक्षांचे सहीने पत्र पाठवून गोंदिया येथे बोलवावे असे सांगीतले होते. तेव्हा पत्र पाठविण्यात आलेले आहे असे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले.

८. **महाराष्ट्र राज्य को-ऑप. मार्केटींग सोसायटी लि. मुंबई. :- हमाली चे पैसे न मिळाल्याबाबत:-** आजचे सभेत श्री दिनेश अग्रवाल प्रोप्रायटर गीता राईस मिल यांनी निवेदन दिले होते की, महाराष्ट्र राज्य को-ऑप. मार्केटींग सोसायटी लि. मुंबई चे गोंदिया येथील जिल्हा मार्केटींग अधिकाऱ्यांनी त्यांचे व इतर अनेक उद्योजकांचे केलेल्या कामाचे हमाली चे पैसे दिलेले नाहीत अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही सन २००० ते २००५ पर्यंत मार्केटींग फेडरेशन च्या धानाची मिलींग केल्यावरही त्यांची एकूण रू. ७००००/- मार्केटींग फेडरेशनकडून घेणे बाकी आहे परंतू ते दाद देत नाहीत तेव्हा अध्यक्षांनी सदर बाबत महाव्यवस्थापक यांना पत्र पाठविण्याचे निर्देश दिले होते आजचे सभेत महाव्यवस्थापक यांनी पत्र पाठविल्याबद्यल सांगीतले. सभेत महाराष्ट्र राज्य को-ऑप. मार्केटींग सोसायटी लि. गोदियाचे सहा. मार्केटींग अधिकारी उपस्थित होते. त्यांनी सदरबाबत दिनांक ०९.०६.२०११ ला त्यांचे मुख्य

कार्यालयास पत्र पाठविल्याबद्दल सांगीतले तेव्हा कीती उद्योजकांचे पैसे दिलेले नाहीत त्यांची यादी महाव्यवस्थापक यांना सादर करावी व पुढील प्रगतीबाबत अवगत करावे असे निर्देश अध्यक्षांनी दिलेत. या बाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे असे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले तेव्हा याबाबत फेडरेशन व टी डी सी च्या व्यवस्थापकीय संचालकांना पुनःश्च पत्र पाठविण्यात यावे व सविस्तर माहीती सभेत द्यावी असे निर्देश अध्यक्षांनी सदस्य सचिवांस दिले.

९. **एम एस एस आय डी सीः- अनामत रककम परत न करनेबाबत.:-** श्री विनोद जैन, सचिव गोंदिया चेंबर ऑफ कॉमर्स यांनी सभेत सांगीतले होते की, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाव्दारे उद्योजकांना कोल कोटा सरेंडर करूनही वर्षोनवर्षे लोटल्यानंतरही त्यांची अनामत रक्कम अनेकवेळा पत्र पाठवुनही परत केल्या जात नाही. आजचे सभेत एमएसएसआयडीसी चे विभागीय व्यवस्थापक श्री एस. सी. शाह उपस्थित होते सदर तक्रारीबाबत त्यांनी सांगीतले की २९ उद्योजकांपैकी १० उद्योजकांना अनामत रक्कम परत केलेली आहे व उर्वरित उद्योजकांची रक्कम जमाखर्च ताळमेळ झाल्यावर परत करण्यात येईल.

१०. **जिल्हयातील राईस मिल्स आजारी उद्योग घोषित करण्याबाबतः-** याबाबत दिनांक १८.०७.२०११ रोजी प्रस्ताव राज्य स्तरीय उद्योगमित्र यांचेकडे पाठविण्यात आला असल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले. याच सोबत श्री विजय अग्रवाल यांनी आजारी उद्योगांचे निकष काय आहेत याची विचारणा केली असता मा. अध्यक्षांनी याबाबत संबधित बँकेत आजारी उद्योगांच्या निकषाबाबत उद्योजकांनी परस्पर संपर्क साधावा असे सांगीतले.

११. **महावितरण : तात्काळ प्रदानाबाबत.**:- तात्काळ प्रदानाचे डिस्काउंट बिल १० दिवस आधी उद्योकांना देण्याबाबत विजवितरण कंपनीला पत्र द्यावे व अधिक्षक अभियंता यांना सभेत बोलविण्यात यावे अशी मागणी सभेत करण्यात आली जेणेकरून उद्योजकांना धनादेशाव्दारे बिलाची रक्कम जमा करता येईल व मुदतीच्या आत विजबिल भरल्याने जी सवलत उद्योजकांना आहे ती घेता येईल तेव्हा याबाबत पत्र पाठविण्याचे सदस्य सचिव हयांना अध्यक्षांनी निर्देश दिले.

**१२. जागेच्या निवासी वापराकरीता परवानगी देण्याबाबतच्या अर्जावर नियत कालावधीत निर्णय देण्यात यावा :-** सदर मुद्या जय बम्लेश्वरी राईस मिलचे प्रोप्रायटर श्री प्रकाश जायस्वाल यांनी उपस्थित केला उद्योगांचे शेजारी जागेच्या निवासी वापराकरीता परवानगी मागणाऱ्या अर्जावर संबधित विभागाव्दारे नियत कालावधीत निर्णय देण्यात यावा जेणे करून जर कुणास आक्षेप असल्यास त्याला त्याविरूध्द अपिल करता येईल. यावर त्यासंदर्भात पत्र पाठविण्यात आले असल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले.

**१३. स्टॅम्प कलेक्टर जिल्हयात ३ दिवस येत नसल्याबाबत :-** जिल्हयात स्टँम्प कलेक्टर कमीत कमी ३ दिवस उपस्थित राहण्याचे शासनाचे निर्देश असुनही त्याचें पालन होत नसल्याबाबत सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली तेव्हा संबधितास पत्र पाठवुन याबाबत कळविण्याचे निर्देश अध्यक्ष महोदयांनी सदस्य सचिव हयांना दिले होते. आजचे सभेत पत्र पाठविण्यात आले असल्याबाबत महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले.

**१४.२०० हॉर्स पावर कनेक्शन ग्रामिण भागात मिळणेबाबत.:-** मागील सभेत श्री गजाननजी अग्रवाल यांनी सांगीतले की, फक्त महानगरपालीका क्षेत्रातच २०० हार्स पावर पेक्षा जास्त विज कनेक्शन उपलब्ध होते परंतु जास्तीत जास्त लघु उद्योग हे ग्रामिण भागात लागतात तेव्हा low tension category लाईन मध्ये एम आय डी सी, व इतर नगर पालिका तसेच ग्रामिण भागातही २०० एच पी चे कनेक्शन मिळावयास पाहीजे तेव्हा मागील सभेच्यावेळी महावितरणचे अधिकाऱ्यांनी सांगीतले होते की, आपण तसा प्रस्ताव सादर करावा म्हणजे सदर प्रस्ताव वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवीला जाईल. परंतु आजचे सभेत अद्याप प्रस्ताव अप्राप्त असल्याबाबत महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले.

१५. **जि.उ.मि. सभा दर महीन्यात घेणेबाबत:-** श्री विजय अग्रवाल यांनी सदर मुद्दा उपस्थित केला की जिल्हा उद्योग मित्र सभा परिपत्रकानुसार घेण्यात येत नाही. अशी विचारणा केली असता श्री पराते महाव्यवस्थापक यांनी निदान तीन महीन्यातून एकदा सभा घेण्याचे निर्देश विद्यमान विकास आयुक्त यांनी महाव्यवस्थापक यांचे दिनांक १९.०७.२०११ रोजीच्या सभेत दिलेले आहेत असे सांगीतले तेव्हा औद्योगीक संघटनांनी सुध्दा याबाबत सहमती दर्शविली.

१६. **चिल्लर मिळणेबाबत :-** आटाचक्की असोसिएशन तर्फे श्री शिवकूमार अग्रवाल यांनी आटाचक्की उद्योजकांना बँकेतून चिल्लर (नाणी) मिळणेबाबत मागणी केली असता श्री वालदे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक यांनी दोन ठिकाणी चिल्लर ची मशीन लावलेली असून प्रत्येकांना २०० नाणी मिळत आहेत असे सांगीतले. त्यावर आठवडयातून दोन वेळा आटा चक्की असोसिएशन पदाधिकाऱ्यांना मागणी केल्यावर चिल्लर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जाईल असे श्री वालदे यांनी सांगीतले. तसेच आटाचक्की व्यवसायाकरीता फिक्स चार्जेस पासून सवलत मिळण्याकरीता महावितरणला पत्र पाठविण्याकरीता आटाचक्की असोसिएशनने लेखी प्रस्ताव सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

१७. **आजारी उद्योग सभा :-** तसेच यानंतर आजारी उद्योगांबाबत चर्चा करण्यात आली तेव्हा महाव्यवस्थापक यांनी सांगीतले की जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया कार्यालयास याबाबत एकही तक्रार किंवा अर्ज आजपावेतो प्राप्त झालेली नाही तेव्हा याबाबत सर्वांनी समाधान व्यक्त केले.

यानंतर उपस्थितांचे आभार मानुन अध्यक्ष महोदयांचे परवाागीने सभा संपली असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,<br>उद्योग मित्र समिती सभा<br>गोंदिया. | महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव<br>जिल्हा उद्योग मित्र समिती<br>गोंदिया. |